VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# मुलींच्यासाठी शाळा - महाविद्यालयांमध्ये राबवायचे विशेष उपक्रम

**प्रा. डॉ. शैलजा मंडले**
सहाय्यक प्राध्यापक
बी. ए. बी. एड्. विभाग
महावीर महाविद्यालय,कोल्हापूर.

सध्याच्या काळात माध्यमांचे प्रमाण वाढले आहे. एकत्र कुटूंबपद्धतींमुळे ऱ्हास झालेला आहे. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे पालक नोकरीच्या निमित्ताने बाहेर जातात. त्यामुळे घरातील पाल्यांशी पालकांचा संवाद कमी होत चाललेला आहे. त्यामुळे शाळा - महाविद्यालयांची जबाबदारी वाढली आहे. औपचारिक शिक्षणाबरोबरच मुलींमध्ये जाणीव जागृती करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मुलींवर होणाऱ्या अत्याचारांची समस्या वाढत असताना दिसत आहे. यासाठी मुली बोलत नाहीत. बोलल्या तर त्यांना दोषी ठरवले जाते, त्यामुळे कांही मुलींचे शिक्षणासाठी बाहेर येणे बंद होते. तसेच चोवीस तास पालक, शिक्षक लक्ष देऊ शकत नाहीत. शाळा- महाविद्यालयांमध्ये शासनातर्फे वैधानिक समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. २०१३चा विशाखा कायदा हा या समितीचा पाया आहे. परंतु या समितीनुसार मुलींच्यासाठी शाळा- महाविद्यालयांमध्ये सूचना पेटी लावलेली असते. त्यामध्ये त्यांच्यावर झालेल्या छेडछाडी संदर्भात दखल घेतली जाते. कांही वेळेला पोलीसांच्या निर्भया पथकाची मदत घेतली जाते. सदर संशोधन पेपरमध्ये पुढील उद्दिष्टे आहेत.

**उद्दिष्टे -**

१) अंतर्गत तक्रार निवारण समिती मध्ये मुलींच्या जागृतीसाठी कोणते उपक्रम राबविले जातात याची माहिती घेणे.

२)शाळा-महाविद्यालयांमध्ये लैंगिक छेडछाड / अत्याचारासंबंधी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांव्यतिरिक्त कोणते उपक्रम राबविले पाहिजेत याबाबत शिफारस सुचविणे.

**उद्दिष्टे क्रमांक १-** अंतर्गत तक्रार निवारण समिती द्वारे शाळा -महाविद्यालयांमध्ये कोणते उपक्रम राबविले जातात याची माहिती घेणे.

शाळा- महाविद्यालयांमध्ये मुलींच्यांसाठी लैंगिक छेडछाडी संदर्भात व्याख्याने, पोस्टर प्रेझेंटेशन, निबंध स्पर्धा हे उपक्रम राबविले जातात.

**उद्दिष्टे क्रमांक २** – शाळा - महाविद्यालयांमध्ये लैंगिक छेडछाड/अत्याचारांसंबंधी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांव्यतिरिक्त कोणते उपक्रम राबवावेत याबाबत शिफारशी सुचविणे.

१) नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ३ ते ८ हा वयोगट नर्सरी शिक्षण पहिली ते दुसरी मध्ये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. यामधील मुलींच्या साठी कांही शाळांमध्ये (Good Touch) गुड टच व बॅड टच (Bad Touch) हे उपक्रमांद्वारे, फिल्मसद्वारे सांगितले जाते. ते सर्व शाळांमध्ये या वयोगटाला सक्तीचे शिकवावे.

२) नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ८ते ११ (पूर्व प्राथमिक स्टेज) या वयोगटामध्ये इयत्ता तिसरी, चौथी, पाचवी यामधील मुला-मुलींच्यासाठी ‘कराटे प्रशिक्षण’, ‘दांडपट्टा’ हे सक्तीचे करावे. तसेच आपल्या शरीराचे वैयक्तिक भागांना कोणाचाही हात लागु नये हे त्यांना व्यवस्थित समजून सांगावे. तसेच पालक सभेमध्ये पालकांना याविषयी आपल्या पाल्यांना समजून सांगण्यास सांगावे. पालकसभेमध्ये एखादे वकील, डॉक्टर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवावे.

३) नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्रारंभिक स्टेज वय वर्ष ११ ते १४ या वयोगटातील मुला-मुलींसाठी कृतीवर आधारित अध्ययनांमध्ये व्यावसायिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जेणेकरुन विद्यार्थी कार्यप्रवण होतील. त्यांच्यातील उमलणाऱ्या शारीरिक उर्जेला योग्य दिशा देणारा अभ्यासक्रम समग्र शिक्षण पद्धतीमध्ये असणार आहे. यासाठी शिक्षक व पालकांनी या विद्यार्थ्यांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करुन खुलेपणाने मार्गदर्शन करुन योग्य/अयोग्य गोष्टीचा उहापोह करावा. विद्यार्थ्यांच्या मतांचा, विचाराचा योग्य आदर करुन त्यांच्या विचार प्रक्रियांना चालना देण्याचे काम करायचे आहे. मोबाईलचा वापर, त्यामधील कोणत्या गोष्टी आपला पाल्य पाहतो आहे हे नकळतपणे पाहणे व त्यासाठी हळुवारपणे समुपदेशन करण्यासाठी निरनिराळ्या युक्ती/ प्रयुक्तींचे तंत्र पालक व शिक्षकांनी वापरावे.

या वयोगटांतील मुलांच्यासाठी लैंगिक शिक्षणावर आधारित Quiz-time सारखी स्पर्धा घेऊन त्यांच्या मनातील शंकांना उत्तरे द्यावीत यासाठी फिल्मसद्वारे व्हॉटसअप ग्रुप वर चर्चा करावी.

वरील विविध उपक्रमांद्वारे शाळेतील, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षक, पालक, शिक्षणपद्धती मध्ये मुलींच्या वर होणाऱ्या अत्याचारासाठी, छेडछाडीसाठी समाजाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. मुलींना, स्त्रियांना स्वत:चे संरक्षण कसे करावे, मानसिक प्रगल्भता वाढवून स्त्रिया या प्रक्रियेतून कशा निभावतील या विषयी विचारांची सजगता वाढविणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची –**

1. नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
2. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
3. Kusheti P. J (Advocate)
4. Delhi High Court, **Prevention and Protection from Sexual Harassment.**